


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : २२८ ● पुणे ● मंगळवार, दि. २२ जुलै २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



युवा शेतकरी संघातर्फे तळजाई पठारावर वृक्षारोपण 3



फुफ्फुस विकारग्रस्तांना प्राणवायू उपकरण संचांची भेट 4











# तपासातले अपयश




कायद्याचे एक मूलभूत तत्त्व आहे, शंभर अपराधी सुटले तरी चालतील पण एकाही निरपराध्याला शिक्षा होता कामा नये! याच तत्त्वाचे पालन करत २००६ मध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोटातील बाराही आरोपींची पुराव्याअभावी मुक्तता केली. न्यायालयाने त्याची कारणेही दिली आहेत, त्याचे प्रमुख कारण आहे ते म्हणजे या आरोपींनी बॉम्बस्फोटाचा कट रचला हे सिद्ध करण्यात सरकार पक्ष साफ अपयशी ठरला! न्यायालयाने काही साक्षीदारांच्या साक्षींबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. न्यायालयाने सरकार पक्षावर कडक ताशेरेही ओढले आहेत. न्यायालयाच्या म्हणण्यानुसार, हे साखळी स्फोट असल्याचे सिद्ध करण्यास सरकार अपयशी ठरला आहे.

न्यायमूर्ती अनिल किलोर आणि एस. एम. चांडक यांनी हा ऐतिहासिक निकाल देताना काही निरीक्षणे नोंदवली आहेत. ती कायद्याच्या अभ्यासूंनी अभ्यासण्यासारखी आहेत. त्यांनी म्हटले आहे की, ज्या साक्षीदाराने बॉम्ब जुळवताना पाहिले होते, तो १०० दिवस गप्प का राहिला?

संशयित आरोपींना तुरुंगात ठेवण्यासाठी जी शेवटची मुदत आहे, तीही सरकार पक्ष पाळू शकला नाही. त्यामुळे, या खटल्यातील अनेक आरोपींनी १८ वर्षे गजाआड काढली आहेत. कोणत्याही न्यायतत्त्वात हे बसत नाही. २००६ च्या जुलैमधील सायंकाळी गर्दीच्या दिवशी १८९ लोक या भीषण बॉम्बस्फोटात ठार झाले, तर ८२७ जण जखमी झाले.

सायंकाळी ऐन गर्दीच्या वेळेस खार, सांताक्रूझ, जोगेश्वरी, माहीम जंक्शन, मीरा रोड, भाईंदर आणि माटुंगा अशा ठिकाणी हे बॉम्बस्फोट झाले. यासाठी कोणत्या प्रकारची स्फोटके वापरण्यात आली हेही सरकार पक्ष सिद्ध करू शकला नाही. सरकार पक्षाच्या म्हणण्यात वैधता सिद्ध झाली नाही. तसेच आरोपींची जी ओळखपरेड झाली, तीही न्यायालयाने नाकारली. ती ओळखपरेड योग्य सक्षम अधिकाऱ्यासमोर झाली नाही, असे न्यायालयाचे म्हणणे आहे. खालच्या न्यायालयात सात जणांना फाशीची शिक्षा ठोठावली होती. पण आता त्या सर्व शिक्षा रद्द झाल्या आहेत.

कोणत्याही खटल्यात ट्रायल कोर्टाच्या फाशीच्या शिक्षेला उच्च न्यायालयाकडून मंजुरी घ्यावी लागते. पण तीच सरकार पक्ष घेण्यात कमी पडला, हे यावरून सिद्ध होते. आता प्रश्न निर्माण होतो, की मग हे बॉम्बस्फोट घडवले कुणी आणि कोणत्या साधनाने? कारण इतके मृत्यू झाले, म्हणजे, कुणीतरी स्फोट घडवले असणारच. पण याच आरोपींनी ते घडवले आहेत, हे सिद्ध करण्यात सरकार पक्ष अपयशी ठरला असा याचा अर्थ आहे. न्यायमूर्ती चौधरी यांनी असा युक्तिवाद केला होता, की काही दिवसांच्या आतच काही आरोपींनी आपला छळ केला जात असल्याचा आणि दबाव आणला जात असल्याचा आरोप केला होता. एका आरोपीचे कोरोना काळात निधनही झाले.

मुंबई उच्च न्यायालयाने वरील निकाल दिल्यानंतर, समोर येईल तो पुरावा ग्राह्य धरता येईल का? असा प्रश्न तपास यंत्रणांसमोर उभा राहिला आहे. मुंबई साखळी स्फोटातील सर्व आरोपीना निर्दोष सोडून दिल्याने आता न्यायदान प्रक्रियेवर आणि पोलिसांच्या तपास पद्धतीवर प्रश्न निर्माण झाले आहेत. पोलीस तपासात अनेक त्रुटी आढळल्या आणि या प्रकरणाची जटिलता पाहता उपलब्ध पुरावे पुरेसे नाहीत असे न्यायालयाने निरीक्षण नोंदवले आहे. त्यामुळे भारतातील न्यायदान प्रक्रिया आणि पोलीस तपासपद्धती संशयाच्या भोवऱ्यात आली आहे, असे म्हणावे लागेल. या खटल्यात १९२ साक्षीदार असतानाही मुंबई उच्च न्यायालयाने सर्व आरोपींना पुराव्याअभावी सोडून दिले. याची सर्वांनी आणि विशेषतः कायदेविषयक सेवेतल्या व्यक्तींनी जाणीव करून घ्यायला हवी. साक्षीदारांच्या जबाबात तथ्य आढळले नाही आणि स्फोटात बॉम्ब कोणते वापरले होते, हे सांगण्यात साक्षीदाराना अपयश आले. या खटल्याच्या निकालातून एक सिद्ध होते ती बाब, म्हणजे न्यायमूर्ती पुरावा ठोस असेल तरच ग्राह्य धरतात. कोणताही अभिनिवेश तेथे चालत नाही. जे सत्य असेल, तेच न्यायालय ग्राह्य धरते. १९ वर्षांनंतर आता हा निकाल आला आहे. देशाचा न्यायसंवर्धनेवर विश्वास यामुळे मजबूत होईल का? आरोपींनी कबुलीजबाब द्यावा म्हणून आरोपीचा छळ केला होता, असे आरोपींचे म्हणणे न्यायालयाने ग्राह्य धरले. या सर्व प्रकरणात एटीएसची भूमिका संशयास्पद राहिली. काही वेळा राजकीय पक्ष सरकारवर दबाव आणून आणि न्यायव्यवस्थेवर दबाव टाकून आरोपींची मुक्तता करण्यासाठीही प्रयत्न करतात. इतिहासात पूर्वी असे अनेकदा घडले आहे. काही बाबतीत लोकांना एका विशिष्ट समाजाबद्दल प्रेम किंवा तिरस्कार वाटतो आणि त्यातून न्यायव्यवस्थेवर दबाव वाढत जातो आणि न्यायाधीशही मग लोकांना आवडेल असाच निकाल देतात.

सर्वच न्यायाधीश असे नसतात; पण काहींबाबत चर्चा होते. व्यवस्था शरण न्यायमूर्तींमुळे असे निकाल प्रभावित होता. पण न्यायमूर्ती चांडक आणि न्या. किलोर यांचे कौतुक करायला हवे. त्यांनी कोणत्याही दबावाला किंवा लोकभावनेला बळी न पडता आपला निकाल दिला आणि १२ आरोपींना आरोपमुक्त केले. कोणत्याही न्यायव्यवस्थेने कायद्याच्या चौकटीत राहून आणि पुराव्याच्या आधारे निकाल दिला पाहिजे.न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य आणि कायद्याचे पालन यात महत्त्वाचे आहे. आता प्रश्न उरतोच, की मग बॉम्बस्फोट केले कुणी? त्यासाठी तपास यंत्रणांना आणखी तपास करावा लागेल आणि खरे उत्तर शोधावे लागेल. त्याशिवाय कायदाप्रेमी शांत बसणार नाहीत आणि ज्यांचा जीव गेला, त्यांच्याही आत्म्याला तोपर्यंत शांती मिळणार नाही. या आरोपींमध्ये खालच्या कोर्टाने दोषी ठरवलेल्या आणि मृत्युदंडाची शिक्षा ठोठावलेल्या पाच जणांचाही समावेश आहे. उच्च न्यायालयाने अविश्वसनीय साक्षीदार आणि दोषपूर्ण खटल्यांचा हवाला दिला आहे. सरकारी वकील संशयापलीकडे खटला सिद्ध करण्यात अपयशी ठरले असे उच्च न्यायालयाने म्हटले आहे. पण हा निकाल म्हणजे तपासकर्त्यांना एक प्रकारचा धक्का आहे आणि सरकारी पक्षाने किती गलथानपणे या खटल्यात आरोपींना गोवले आहे हे दाखवून देणारा हा निकाल आहे, असे खेदाने म्हणावे लागते. या खटल्याचा निकाल भविष्यातील खटल्यासांठी मार्गदर्शक ठरू शकेल.

# खडकवासल्यातील मनपा शाळेला शिक्षक मिळेना

## स्वच्छतागृहासह मैदानाची दुरवस्था : दत्ताभाऊ कोल्हे यांचा आंदोलनाचा इशारा

**लक्ष्मण साबळे**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
नव्याने पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या खडकवासला येथील मनपा शाळा क्रमांक 01 मध्ये शिक्षण सेवकांच्या अभावामुळे विद्यार्थ्यांचे मोठे हाल सुरू आहेत. मैदानाची दुरवस्था, नादुरुस्त स्वच्छतागृहे आणि मोडकळीस आलेली इमारत यामुळे शाळेची अवस्था अत्यंत दयनीय बनली आहे.

महाराष्ट्र भाजप ओबीसी मोर्चाचे सचिव दत्ताभाऊ कोल्हे यांनी नुकतीच या शाळेस भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांनी मुख्याध्यापक अमोल माने आणि इतर शिक्षकांशी संवाद साधत शाळेच्या सध्याच्या परिस्थितीबाबत सविस्तर माहिती घेतली. विद्यार्थ्यांशीही संवाद साधून त्यांनी समस्या जाणून घेतल्या.

शाळेत मंजूर 6 पदांपैकी सध्या केवळ 5 पदे कार्यरत आहेत. त्यातही दोन शिक्षण सेवक मागील 6 महिन्यांपासून बिनपगारी रजेवर आहेत. परिणामी, सध्या केवळ 3 शिक्षक 160 विद्यार्थ्यांची जबाबदारी सांभाळत आहेत. अनेक वर्गांना शिक्षकच उपलब्ध नाहीत.

मुख्याध्यापक पदाचा कार्यभार सांभाळणारे अमोल माने हे स्वतः दोन वर्गांना शिकवत आहेत, मात्र मुख्याध्यापक पदाचे विविध प्रशासनिक कामकाज आणि बैठकांमुळे त्यांनाही वर्गात सतत उपस्थित राहता येत नाही. परिणामी, इतर शिक्षकांवर अतिरिक्त ताण येत आहे.

शाळेतील मैदान गवताने व्यापले आहे. खेळण्यासाठी योग्य अशी जागा राहिलेली नाही. स्वच्छतागृहेही निकामी झाली असून विद्यार्थ्यांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. याशिवाय इमारतीची अवस्था देखील धोकादायक झाली आहे.

दत्ताभाऊ कोल्हे यांनी स्पष्ट इशारा दिला की, विद्यार्थ्यांचे हाल थांबले नाहीत, तर पालकांसह तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. त्यांनी प्रशासनाकडे खालील मागण्या केल्या –

रिक्त असलेल्या शिक्षण सेवकांच्या जागा तातडीने भराव्यात.

मैदानाची डागडुजी करण्यात यावी.

नवीन शाळा इमारतीसाठी प्रस्ताव तातडीने मंजूर करून निधी वितरित करण्यात यावा.

मुख्याध्यापक अमोल माने यांनी सांगितले की, "प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन दोन नवीन शिक्षकांची नेमणूक करावी, विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत आहे. श्री. सुरेश उचले साहेबांनी शाळेला भेट देऊन सर्व माहिती घेतली आहे. लवकरच या संदर्भात निर्णय होईल अशी अपेक्षा आहे."

या परिस्थितीवर प्रशासनाने त्वरीत उपाययोजना करावी, अन्यथा हा विषय जनआंदोलनाच्या माध्यमातून पुढे नेण्यात येईल, असा निर्धार दत्ताभाऊ कोल्हे यांनी व्यक्त केला.

# थोडक्यात





## शिव वंदना व न्यू आर्या फाउंडेशन यांच्यावतीने रुग्णवाहिकेचे लोकार्पण!

**पुणे (आरंभ पर्व) : शिव वंदना मित्रपरिवार धायरी व न्यू आर्या फाउंडेशन धायरी यांच्या वतीने मोफत रुग्णवाहिकेचे लोकार्पण प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे यांच्या हस्ते व्यंकटसाई होंडा शोरूम, रायकर नगर, धायरी येथे करण्यात आले. यावेळी बोलताना राजेश पांडे यांनी धायरी परिसरामध्ये प्राज भिलारे करत असलेले काम कौतुकास्पद आहे, असे म्हटले. भविष्यातही आम्हा सर्वांची ताकद त्याच्या पाठीशी आहे, असा विश्वास राजेश पांडे यांनी दिला व व्यंकटसाई होंडा चे विशेष कौतुक केले. यावेळी डॉक्टर सुजित निलेगावकर, हिंदुत्वनिष्ठनेते दीपक नागपुरे, माजी नगरसेवक बाळासाहेब नवले सामाजिक कार्यकर्ते किशोर पोकळे, बापूसाहेब पोकळे, व्यंकटसाई होंडा चे संतोष कदम, सुहासबापू चाकणकर, खडकवासला शिवसेना ठाकरे अध्यक्ष नितीन वाघ, हेमेंद्र जोशी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रास्ताविक प्राज भिलारे यांनी केले. यावेळी बोलताना ते म्हटले, "मोफत रुग्णवाहिकेचा धायरीतील हा पहिलाच उपक्रम असून, धायरी व परिसरातील नागरिकांसाठी मोफत रुग्णवाहिकेची आवश्यकता होती त्यामुळे ही रुग्णवाहिका गोरगरिबांना व नागरिकांना मोफत सुविधा देणार आहे". राष्ट्रभक्तीने प्रेरित होऊन डॉक्टर निलेगावकर यांनी केलेल्या या कार्याबद्दल भिलारे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत पितालिया यांनी केले. शिववंदनेने कार्यक्रमाची सांगता झाली. धायरी येथील व्यंकटसाई होंडाच्या सौजन्याने या उपक्रमाला गती मिळणार आहे.**

# बावधनवासीयांचे खड्ड्यांत झाडे लावून आंदोलन

**कर्वेनगर (दै. आरंभ पर्व)**
बावधन परिसरातील रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. यामुळे अनेक समस्या उद्भवल्या असून, याबाबत वारंवार तक्रारी करूनही पुणे महापालिकेकडून दुर्लक्ष होत असल्याने बावधनमधील स्थानिक नागरिकांनी रस्त्यावरील खड्ड्यांत झाडे लावून अनोखे आंदोलन केले. बावधन परिससात अनेक उच्चभ्रू सोसायटी तयार झाल्या आहेत, मात्र पायाभूत सुविधा पुरविण्याबाबत प्रशासन अपयशी ठरत आहे. रस्त्याची तर भयंकर दुरवस्था झालीअसून, रस्ते दुरुस्ती होत नसल्याने प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी नागरिकांनी खड्ड्यांमध्ये रोपे लावून प्रशासनाच्या उदासीनतेचा समाचार घेतला. खड्डे पडल्याने अपघातांची शक्यता दिवसेंदिवस वाढत आहे. पावसाचे पाणी खड्ड्यात साचून राहिल्याने खड्डे दिसत नाहीत आणि त्यामुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नसल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. 'रस्ते दुरुस्त होत नसतील तर निदान झाडे तरी उगवू द्या!' अशा आशयाचे फलक आणि घोषणा देत रहिवाशांनी या समस्येवर प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले.

# अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद




**पुणे (दै. आरंभ पर्व)**
कोल्हेवाडी येथे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

क्रेझ इंग्लिश मीडियम स्कूल कोल्हेवाडी येथे हे शिबिर पार पडले. खडकवासला विधानसभा मतदार संघ राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष सागर कोल्हे यांनी ह्या शिबिराचे आयोजन केले होते.

यामध्ये 151रक्त पिशव्या संकलित करण्यात आल्या. ह्याचे संकलन भोसरी येथील रेड प्लस ब्लड बँक यांनी केले. ह्या रक्तदान शिबिरावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी खडकवासला विधानसभा अध्यक्ष माजी नगरसेवक बाबा धुमाळ, माजी नगरसेवक कार्यअध्यक्ष पुणे शहर अक्रूर कुदळे, प्रवक्ते राहूलभाऊ पोकळे, खडकवासला माजी सरपंच सौरभ मते ,निलेश पाडे.संजय ठोबरे. बाबासाहेब भुकम.विवेक धुमाळ. संतोष हरकळ.अध्यक्ष महिला जयश्री कामठे डॉ निलेश कोळपकर शैलेश मते.राजेद्र कोल्हे, पोलिस निरीक्षक दत्ताभाऊ कोल्हे,दर्शन रायकर. प्रतिक होले .राहूल कोल्हे. आदी मान्यवर व रक्तदाते उपस्थित होते.

यावेळी बोलताना आयोजक सागर कोल्हे यांनी रक्तदान हे श्रेष्ठदान आहे. ह्यातून अनेकांचा जीव वाचवला जातो. त्यासाठी सर्वांनी रक्तदान करणे गरजेचे असल्याचे यावेळी सांगितले व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना उदंड आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. अत्यंत उत्साहात हा कार्यक्रम संपन्न झाला.




## कर्करोग नियंत्रणासाठी ग्रामीण भागात प्रतिबंधात्मक उपायोजना कराव्यात

**नवी दिल्ली/पुणे (आरंभ पर्व) :महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील महिलांमध्ये कर्करोगाच्या वाढत्या संख्येबाबत राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा विश्राम कुलकर्णी यांनी सोमवारी संसदेत लक्ष वेधले. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी सत्रात महिलांमधील वाढत्या कर्करोगाबाबत चिंता व्यक्त करत कर्करोग नियंत्रणासाठी शासनाने प्रतिबंधात्मक उपायोजना त्वरित कराव्यात, अशी मागणी केली. प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, हिंगोली जिल्ह्यात अलीकडेच झालेल्या 'संजिवनी' आरोग्य तपासणी मोहिमेत २.९३ लाख महिलांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये १४,५०० महिलांमध्ये कर्करोगाची लक्षणे आढळून आली आहेत. ही बाब अत्यंत गंभीर असून, ग्रामीण आणि वंचित भागांमध्ये वेळेवर निदान, त्वरित उपचार आणि सुविधा उपलब्ध करून देणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. मोठ्या प्रमाणावर राबवण्यात येणाऱ्या आरोग्य तपासणी मोहिमा स्तुत्य असल्या तरी त्या केवळ पहिला टप्पा असून, त्यानंतरच्या उपचार, फॉलोअप आणि वैद्यकीय पायाभूत सुविधांचा अभाव मोठा अडथळा ठरतो, असे त्यांनी स्पष्ट केले. या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने काही तातडीच्या उपाययोजना राबवाव्यात अशी मागणी त्यांनी केली. डॉ. कुलकर्णी यांनी स्थानिक आरोग्य केंद्रांमध्ये मॅमोग्राफी, गर्भाशय मुख तपासणी व बायोप्सीसारख्या निदान चाचण्यांसाठी अद्ययावत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याची सूचना मांडली. त्याचप्रमाणे दुर्गम भागांमध्ये मोबाइल ऑन्कोलॉजी युनिट्स (कर्करोग निदान गाड्या) उपलब्ध करून सुरुवातीच्या टप्प्यावरच निदान करण्याची गरज त्यांनी मांडली. महिलांमध्ये कर्करोगाच्या सुरुवातीच्या लक्षणांची जाणीव व्हावी व या आजाराबाबतचा सामाजिक कलंक दूर व्हावा यासाठी व्यापक जनजागृती मोहिमा राबवाव्यात, असेही त्यांनी सुचवले. आयुष्मान भारत आणि महात्मा फुले जनआरोग्य योजनेसारख्या योजना अधिक प्रभावीपणे राबवून कर्करोग निदान व उपचारांचा संपूर्ण खर्च या माध्यमातून करावा, अशी शिफारस त्यांनी केली.**

# अजितदादा पवार यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

## भूपेंद्र मोरे यांनी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**लक्ष्मण साबळे**






**पुणे (दै. आरंभ पर्व)**
राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली शिवराज्य समूह पुणे तर्फे विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

यावेळी विविध समाज उपयोगी शिबिरांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये नेत्र तपासणी, लहान मुलांचे आधार कार्ड, विविध रक्त तपासणी, ईसीजी, आरटीओ संबंधी इतर कामे, यांचे आयोजन करण्यात आले.

याशिवाय सालाबाद प्रमाणे याही वर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले .त्यास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

भूपेंद्र मोरे मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालय कृष्णाई नगर, नऱ्हे येथे हा कार्यक्रम संपन्न झाला.

गेल्या अनेक वर्षापासून ह्या भागातील जनतेसाठी झटणारे नेतृत्व म्हणून श्री. भूपेंद्र मोरे यांची ओळख आहे.

साहजिकच त्यांना या भागातून मोठा प्रतिसाद असल्याचे या शिबिराच्या निमित्त दिसून आले.

शिवराज्य समूहाच्या वतीने आजपर्यंत हजारो रक्तपेशव्यांचे संकलन करण्यात आले आहे. व गरजूंना रक्तपुरवठाही करण्यात आला आहे.

या शिबिराच्या निमित्त बोलताना श्री .भूपेंद्र मोरे यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

ह्या भागातील नागरिकांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा यासाठी विविध शिबिरांचे आयोजन करण्यात आले. त्यास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

नऱ्हे परिसरातील नागरिकांसाठी या पुढील काळातही प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले .

या कार्यक्रमाप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते श्री .भूपेंद्र मोरे, मिलिंद मराठे, राजाभाऊ जाधव, विठ्ठल सूर्यवंशी जाधव, हरीश वैद्य, लतिफ शेख, सुरज दांगडे, सुनील पढेर, प्रशिक दारुंडे,सोनाली नायर, आनंद थेऊरकर, राहुल कोंडे भूषण भाऊ मोरे, निखिल, संकेत साचुर्डे, तुषार बन, सुशील भागवत, मनोज वाघमारे, महेश घाडगे यांच्यासह विविध मान्यवर, पत्रकार व नागरिक उपस्थित होते.

या रक्तदान शिबिरामध्ये 383 पिशव्या संकलित करण्यात आल्या. याशिवाय 63 आधार कार्ड 375 चष्मे वाटप आणि 285 जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

ह्या शिबिरांच्या माध्यमातून अनेक नागरिकांना फायदा झाला. त्याबद्दल त्यांनी आयोजक श्री भूपेंद्र मोरे यांचे आभार मानले. अत्यंत उत्साहात हा कार्यक्रम संपन्न झाला.

### "मोरे पॅटर्न"ची चर्चा जोरात

**सामाजिक कार्यासाठी झटणाऱ्या श्री .भूपेंद्र मोरे यांच्या कामासाठी नऱ्हेकरांनी "मोरे पॅटर्न"हे स्लोगन निश्चित केले आहे. आणि सध्या जोरात व्हायरल ही होत आहे. कोणत्याही विषयासंबंधी संबंधित अधिकारी व विभागाकडे तातडीने उपाय करून जनतेला न्याय मिळवून देण्यासंबंधी या कामाचा उल्लेख मोरे पॅटर्न म्हणून केला जात आहे. आगामी काळामध्ये ही हा पॅटर्न चांगलाच गाजणार असल्याचे उपस्थित नागरिकांनी सांगितले.**

**आज महाराष्ट्राच्या राजकारणातील अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. राज्याच्या राजकारणातील एक अत्यंत प्रभावशाली आणि दूरदृष्टी असलेले नेते, श्री. देवेंद्र फडणवीस यांचा आज वाढदिवस. देवेंद्र फडणवीस हे विकासाभिमुख, पारदर्शक आणि निर्णायक नेतृत्व असणारे नेते आहेत. 22 जुलै 1970 रोजी नागपूरमध्ये जन्मलेले देवेंद्र फडणवीस हे समाजसेवक गंगाधर फडणवीस यांचे सुपुत्र. लहानपणापासूनच त्यांच्यात राष्ट्रनिष्ठा, सामाजिक भान आणि लोकसेवेचे मूल्य रुजले होते. याच मूल्यांवर आधारित त्यांचा राजकीय प्रवास सुरू झाला.**

## महाराष्ट्राचा विकासनायक

# दूरदृष्टी, निर्णयक्षमता आणि विकासाचा मंत्र देणारे नेता देवेंद्र फडणवीस

**● लेखक ●**
**प्रा. सचिन जायभाये**
**भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश सचिव**

**(दै. आरंभ पर्व)**

**राजकारणातील सुरुवात :** फडणवीस यांनी भारतीय जनता पार्टीच्या युवा मोर्चात सक्रीय सहभाग घेत आपल्या राजकीय वाटचालीस सुरुवात केली. अवघ्या 27 व्या वर्षी देशातील सर्वात तरुण महापौर होण्याचा मान त्यांनी मिळवला. 2009 मध्ये विधानसभेतील विरोधी पक्षनेते, तर 2014 मध्ये ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनले. त्यांचा कार्यकाळ अनेक ऐतिहासिक निर्णयांनी भरलेला आहे. विकासाला चालना देणारी धोरणे, पायाभूत सुविधांमधील क्रांती, आणि पारदर्शक प्रशासन यामुळे त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात आपली वेगळी छाप उमटवली.

महाराष्ट्रातील राजकारणात आधुनिक विकासाची दिशा ठरवणाऱ्या नेत्यांमध्ये देवेंद्र फडणवीस यांचे नाव अग्रगण्य आहे. त्यांच्या राजकीय कारकिर्दीचा आलेख हा एका साध्या कार्यकर्त्यापासून राज्याच्या सर्वोच्च पदापर्यंत झेपावलेला आहे. आज त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्या नेतृत्तवाचा वेध घेणे महत्त्वाचे ठरेल. देवेंद्र फडणवीस हे तंत्रज्ञानाचा वापर करताना नागरिकांशी थेट संवाद साधणारे काही मोजक्या नेत्यांपैकी एक आहेत. सोशल मीडियाचा प्रभावी वापर करून त्यांनी शासन आणि जनतेमधील अंतर कमी केले. त्यांनी ट्विटर, फेसबुक आणि विविध डिजिटल प्लॅटफॉर्मवरून नागरिकांच्या प्रश्नांना उत्तरं दिली, तक्रारी सोडवल्या आणि शासन निर्णय जनतेसमोर मांडले.

**देवेंद्र फडणवीस एक कुशल संघटक :** फडणवीस यांची नेतृत्वशैली ही 'टॉक लेटर – डू मोर' या तत्वावर आधारलेली आहे. भाषणांपेक्षा कृतीवर भर देणारे नेतृत्व त्यांनी सिध्द केले आहे. त्यांच्याकडे धोरणात्मक दृष्टी असून निर्णय घेताना केवळ आजच्या परिस्थितीकडे नाही तर पुढील दशकांचा विचार केला जातो. त्यामुळेच त्यांनी अनेक दीर्घकालीन योजनांना सुरुवात केली. फडणवीस हे फक्त शासकीय निर्णय घेणारे नेता नाहीत, तर भाजपसारख्या मोठ्या पक्षातील संघटनात्मक स्थैर्य टिकवून ठेवणारे कुशल संघटक आहेत. पक्षाचे तरुण कार्यकर्ते, वरिष्ठ नेते आणि यंत्रणा यांच्यात समन्वय साधत त्यांनी पक्षवाढीला चालना दिली. गटबाजी किंवा गोंधळ टाळून त्यांनी संघटनेत शिस्त आणि उद्दिष्टशीलता टिकवली.

**विरोधकांशी परिपक्व संवाद :** एक उत्तम नेतृत्व म्हणजे केवळ आपल्या पक्षाच्या विचारांवर ठाम असलेला नव्हे, तर विरोधकांचेही म्हणणे समजून घेणारा असतो. फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाच्या काळात किंवा विरोधी पक्षात असताना, विरोधकांशी आदराने संवाद साधण्याची भूमिका कायम ठेवली. हे त्यांच्यातील राजकीय परिपक्वतेचे द्योतक आहे. आजच्या तरुण पिढीला राजकारणात नैतिकता, अभ्यासू वृत्ती आणि दृष्टिकोन असलेल्या नेत्यांची आवश्यकता आहे. देवेंद्र फडणवीस हे त्यासाठी एक आदर्श उदाहरण ठरतात. त्यांनी राजकारणात 'सेवा' ही भूमिका ठामपणे घेतली आहे. राजकीय निष्ठा आणि व्यावसायिक कौशल्य यांचा समतोल त्यांच्या व्यक्तिमत्त्वात प्रकर्षाने दिसून येतो.

**अभ्यासू, जागतिक भान असलेला नेता :** देवेंद्र फडणवीस हे केवळ राजकारणी नाहीत, तर जागतिक घडामोडींवर बारकाईने नजर ठेवणारे, अभ्यासू आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा समर्थ वापर करणारे नेते आहेत. त्यांचा दृष्टिकोन सामाजिक समतोल राखणारा आणि दूरदृष्टी असलेला आहे. देवेंद्र फडणवीस यांचा राजकीय प्रवास हा आजच्या युवकांसाठी एक प्रेरणागाथा आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे महाराष्ट्राच्या विकासाची गती नव्या उंचीवर पोहोचली आहे. 'विकास हेच आमचं धोरण' या त्यांच्या ठाम विचाराला अनुसरून त्यांनी पायाभूत सुविधांपासून ते डिजिटल प्रशासनापर्यंत अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले. त्यांच्या कार्यशैलीमुळे एक नव्या युगाचा आरंभ झाला आहे. महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्यांचे कार्य असचं अखंड सुरू राहो, हीच प्रार्थना.

**वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा,**

# देवेंद्रजी!



## थोडक्यात





### दै. आरंभ पर्वचे मार्केटिंग हेड अभिषेक मरगळे यांना 'मार्केटिंग लीडर पुरस्कार'

- **सिनेअभिनेत्री प्रार्थना बेहेरे यांच्या हस्ते प्रदान होणार पुरस्कार!**

**पुणे (आरंभ पर्व) : KPM प्रस्तुत महाराष्ट्र उद्योग गौरव पुरस्कार २०२५ या भव्य आणि प्रतिष्ठेच्या सोहळ्याचे आयोजन येत्या २७ जुलै रोजी पुणे येथे करण्यात येत आहे. या सोहळ्यात राज्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा सन्मान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात दै. आरंभ पर्वचे मार्केटिंग प्रमुख अभिषेक मरगळे यांना 'मार्केटिंग लीडर पुरस्कार २०२५' या सन्मानाने गौरविण्यात येणार आहे. हा पुरस्कार सुप्रसिद्ध सिनेअभिनेत्री प्रार्थना बेहेरे यांच्या हस्ते प्रदान केला जाईल. अभिषेक मरगळे यांनी माध्यम आणि मार्केटिंग क्षेत्रात केलेली कल्पक आणि प्रभावी कामगिरी विशेषत्वाने उल्लेखनीय ठरली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली आरंभ पर्वने ब्रँड उभारणी, डिजिटल व्याप्ती आणि प्रभावी ग्राहक संवादात लक्षणीय यश मिळवले आहे. या पुरस्काराबाबत अभिषेक मरगळे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले, "या सन्मानामुळे जबाबदारी अधिक वाढली आहे. हे यश माझ्या टीमच्या अथक मेहनतीचे फळ आहे आणि 'आरंभ पर्व'चा प्रवास आणखी व्यापक करण्यासाठी आम्ही सज्ज आहोत." VIS यांचे सहकार्य लाभलेला हा पुरस्कार सोहळा उद्योग आणि मीडिया क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. दै. आरंभ पर्व या कार्यक्रमाचा माध्यम भागीदार असून कार्यक्रमाचे विशेष कव्हरेज करण्यात येणार आहे.**

### पुणे पोलिस दलातील निरीक्षकांच्या अंतर्गत बदल्या




**पुणे (आरंभ पर्व) : शहर पोलिस दलातील १२ पोलिस निरीक्षकांच्या प्रशासकीय कारणास्तव अंतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये पाच पोलिस ठाण्यांतील वरिष्ठ निरीक्षकांचा समावेश आहे. याबाबतचा आदेश पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी सोमवारी (ता. २१) काढला.**

## क्रॉम्प्टनकडून वॉटर हीटर रॅपिडजेट टीडीएस २००० लॉँच

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

तुमच्या वॉटर हीटरवर जड पाण्याचा होणारा त्रासदायक परिणाम पाहून कंटाळा आला आहे का - विशेषतः पावसाळ्यात जेव्हा पाण्याची गुणवत्ता अनेकदा खराब होते? क्रॉम्प्टन ग्रीव्ह्ज कंझ्युमर इलेक्ट्रिकल्स लिमिटेड या भारतातील ग्राहक इलेक्ट्रिकल्समधील विश्वसनीय कंपनीने रॅपिडजेट टीडीएस 2000 लॉँच केला आहे. हा क्रांतिकारी इंस्टण्ट वॉटर हीटर विशेषत: जड पाण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. या तंत्रज्ञान-अग्रणी उत्पादनामध्ये अँटी-स्केल टेक्नॉलॉजी आहे, जे क्रॉम्प्टनच्या वॉटर हीटर पोर्टफोलिओमध्ये पहिल्यांदाच समाविष्ट करण्यात आले आहे. हा वॉटर हीटर टिकाऊपणा आणि कार्यक्षमतेमध्ये नवीन मापदंड स्थापित करतो. तसेच आधुनिक काळातील कुटुंबांसाठी दीर्घकालीन




कार्यक्षमता आणि विश्वसनीय आरामदायीपणाची खात्री देतो. या वर्षी पावसाळा लवकर सुरू होण्यासह देशभरात मोठ्या प्रमाणात पाऊस पडला आहे, आयएमडीने दीर्घकालीन सरासरीपेक्षा 105 टक्के पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवला आहे. हे दिलासादायक असले तरी अशा मुसळधार पावसामुळे अनेकदा पृष्ठभागावरील पाणी दूषित होते, ज्यामुळे घरांना बोअरवेलच्या पाण्यावर अधिक अवलंबून राहावे लागते, जे सामान्यत: जे जड आणि मिनरलने युक्त असते.

## युवा शेतकरी संघातर्फे तळजाई पठारावर वृक्षारोपण

### झाडे लावा झाडे जगवा हा संदेश सर्वांनी कृतीमध्ये आणावा : चोरगे






**धनकवडी (दै. आरंभ पर्व)**

युवा शेतकरी संघातर्फे तर्फे तळजाई पठार येथे वृक्षरोपण करून सामाजिक जनजागृती करण्यात आली. संस्थापक अध्यक्ष रोहिदास बापू चोरगे यांच्या नेतृत्वाखाली युवा महाराष्ट्र शेतकरी संघ वृक्षारोपण मोहीम चालू केली आहे. त्याचा शुभारंभ तळजाई पठार येथे करण्यात आला.

यावेळी संस्थापक अध्यक्ष रोहिदास बापू चोरगे,पुणे महानगरपालिका (PMC) चे सहाय्यक आयुक्त राजेश कदमाने, दत्ता जरांडे, बाबर काका, दशरथ आप्पा पवार, चंद्रकांत मोरे, राकेश खोपडे, सागर मोझर ,भगवान खुटवड, दत्ता वीर, हेमंत निंबाळकर, उत्तम वीर, दीपक चौगुले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

या वृक्ष लागवड उपक्रमात विविध प्रकारच्या स्थानिक झाडांची लागवड करण्यात आली व पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

सर्वांनी परिसर स्वच्छ व हिरवागार ठेवण्याचा निश्चय व्यक्त केला.

झाडे लावा झाडे जगवा हा संदेश घरोघरी कृतीत आणण्याची गरज आहे. त्यासाठी युवा शेतकरी संघाच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रम सुरू करण्यात आला.

हा उपक्रम सामाजिक जबाबदारीचा भाग म्हणून राबवण्यात आला असून भविष्यातही असे अनेक उपक्रम राबवले जातील, असे आयोजक रोहिदास बापू चोरगे यांनी यावेळी सांगितले.

हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला.





## पाषाणकर ऑटो सोबत ग्राहकांचे विश्वासाचे नातं !

### २४ व्या वर्षात शोरूमचे यशस्वी पदार्पण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एम जी रोड येथील पाषाणकर ऑटो होंडा डीलरशिप या शोरूम चा २४ वा वर्धापन दिन केक कापून साजरा करण्यात आला. याप्रसंगी ग्राहक, कर्मचारी वर्ग, पाषाणकर ऑटो चे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते. पाषाणकर ऑटोचा कर्मचारी वर्ग, ग्राहक यांच्या सहकार्याने 24 व्या वर्षात यशस्वी पदार्पण केले आहे.

पाषाणकर ऑटो हे पुण्याच्या मध्ये भागी असलेले दर्जेदार सेवा देणारे शोरूम असून होंडाच्या सर्व बाईक्स, ऍक्टिवा पासून 750 सी सी पर्यंत सर्व बाईक, एडवेंचर बाइक्स अशा विविध बाईक विक्रीसाठी उपलब्ध आहेत. बेस्ट सेल्स सर्विस टीम मुळे हे शक्य झाले आहे. या सर्वांचं विशेष सहकार्य सहकार्यामुळे यशस्वी वाटचाल करू शकलो याचा आनंद आहे असे गौतम सरांनी बोलताना सांगितले.

याप्रसंगी पाषाणकर ऑटो चे डायरेक्ट सूरज गिरमे, निळकंठ सर गौतम सर, प्रशांत सर, नम्रता मॅडम तसेच पाषाणकर फॅमिली पाषाणकर ऑटो सेल्स सर्विस स्टाफ उपस्थीत होते.

## तुमच्या त्वचेला टवटवीत ठेवण्यासाठी आवश्यक गोष्टी

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

पावसाळा येण्यासह उन्हाळ्यातील कडाक्याच्या तापमानापासून आरामदायी दिलासा मिळतो, पण सोबत काही समस्या देखील घेऊन येतो. त्वचेवर उच्च आर्द्रतेचे परिणाम होतात, त्वचेवर छिद्रे दिसू लागतात, मुरमं येतात आणि त्वचा निस्तेज होते. या हंगामामध्ये तुमची त्वचा चिकट, निस्तेज वाटत असेल तर त्यावर उपाय करण्याची वेळ आली आहे. पावसाळ्यात देखील त्वचा कोमल, स्वच्छ व आरामदायी ठेवण्यासाठी साधे रूटिन उपयुक्त ठरू शकते. क्लीन्सरसह सुरुवात करा, त्वचेमधील अशुद्धी दूर करते. काया प्युरिफायिंग क्लीन्सर अतिरिक्त तेल आणि अशुद्धता काढून टाकते, ज्यामुळे तुमची त्वचा टवटवीत, संतुलित आणि कोमल दिसते. असमान टोन आणि मुरुमांनंतर येणाऱ्या खुणा हाताळा. काया 10 टक्के नियासीनामाइड + 1 टक्का




अझेलोग्लिसिना फेस सीरम पिग्मेंटेशन कमी करते आणि त्वचेची कोमलता वाढवते. ढगाळ वातावरण असताना देखील एसपीएफची आवश्यकता आहे. काया इनव्हिजिबल सनस्क्रीन एसपीएफ 30, पीए+ जेल-आधारित टेक्सचरसह सहजतेने मिसळते. सिका ऑइल आणि 5 यूव्ही फिल्टर्सने युक्त ते सूर्याच्या अतिनील किरणांपासून होणाऱ्या नुकसानापासून संरक्षण करते आणि त्वचेवरील जळजळीपासून आराम देते. एकत्रित, कायाचे हे तिन्ही आवश्यक स्किनकेअर प्रोडक्ट्स पावसाळ्यामध्ये त्वचेला कोमल, संतुलित ठेवतात, तसेच शुद्धता व आरामदायीपणा देतात.

## मुख्यमंत्री यांचा वाढदिवस महारक्तदान व आरोग्य शिबिराने साजरा

- **खडकवासला मंडल अध्यक्ष यशवंत बापू लायगुडे यांचे यशस्वी आयोजन**
- **आगामी महानगरपालिका निवडणुकीमध्ये कार्यकर्त्यांना न्याय मिळणार : आ. तापकीर**



**पुणे-प्रतिक गंगणे (दै. आरंभ पर्व)**

राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या निम्मित धायरी येथे भव्य रक्तदान व आरोग्य शिबिर पार पडले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनानुसार विविध त्यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

धायरी येथे मुक्ताई गार्डन येथे भव्य रक्तदान शिबिर व आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले. याचे आयोजन खडकवासला मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे यांनी केले. त्यास रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला त्यामध्ये 351 रक्त पिशव्या संकलित करण्यात आल्या. जवळपास 500 नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेले काम आदर्श आहे. अशा नेत्याच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान करणे हे भाग्य असल्याचे रक्तदात्यांनी भावना व्यक्त केली.

यावेळी खडकवासला विधानसभेचे आमदार भीमराव तापकीर यांनी रक्तदान शिबिरात भेट देऊन रक्तदात्यांची विचारपूस केली. यावेळी बोलताना आ. भीमराव तापकीर यांनी एका रक्तदानामुळे तिघांना जीवदान मिळते. शिवाय आरोग्यासाठी ही रक्तदान चांगले आहे. सर्वांनी रक्तदान करणे गरजेचे आहे.आगामी महानगरपालिका निवडणुकीमध्ये निश्चितपणे कार्यकर्त्यांना न्याय मिळणार आहे. याशिवाय पार पडलेल्या पावसाळी अधिवेशनात खडकवासला मतदारसंघातील

अनेक प्रश्न मार्गी लागल्याचेही यावेळी आ.तापकीर यांनी सांगितले. यावेळी आ.भिमराव आण्णा तापकीर, भाजपा खडकवासला विधानसभा अध्यक्ष सचिनजी मोरे, माजी नगरसेवक राजाभाऊ लायगुडे, माजी नगरसेविका निताताई दांगट, माजी नगरसेवक हरिदासजी चरवड, माजी नगरसेवक बाळासाहेब नवले,मंडल अध्यक्ष रूपेश घुले, मंडल अध्यक्ष ग्रामीण नवनाथ तांगुदे, खडकवासला भाजपा सरचिटणीस बापूसाहेब पोकळे,हेमंतदादा दांगट,शहाजी वांजळे,सचिनजी मनेरे,सागर भुमकर,अतुलजी चाकणकर,अंनत दादा दांगट, सारंगजी नवले, प्रभाग अध्यक्ष पै.तुषार पोकळे,हेमेंद्र जोशी, अमोलजी ठाकर,प्रविणजी देशमुख,उत्कर्षा पोकळे,तुषार पोकळे,दत्तात्रय देशपांडे यांच्यासह मान्यवर व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आयोजक यशवंत लायगुडे यांनी रक्तदात्यांचे आभार मानले.



# थोडक्यात



## साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न मिळावा : जोगदंड

लोणी काळभोर (आरंभ पर्व) : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न मिळावा ह्या मागणीसाठी अहोरात्र झटणारे मातंग एकता आंदोलनाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष दिगंबर (भाऊ) जोगदंड यांनी आंदोलन चालू केले होते .पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याचे आश्वासन दिले त्यामुळे आंदोलन थांबविण्या आल्याचे जोगदंड यांनी सांगितले. साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांना राज्य सरकारचा प्रस्ताव हा केंद्र सरकारपर्यंत पाठवण्यासाठी गेले चार वर्ष सातत्याने आंदोलन करणारे दिगंबर जोगदंड हे एक मातंग समाजामधील तडफदार नेतृत्व आहे ते छत्रपती शिवाजी महाराज ,फुले शाहू आंबेडकर अण्णाभाऊ साठे यांची विचारधारा घेऊन बहुजन समाजामध्ये अतिशय प्रामाणिकपणे अहोरात्र काम करत आहे. गोरगरीब दलित पिढीत वर्गामध्ये जाऊन अण्णाभाऊ साठे यांचे विचार ते युवकांमध्ये अनेक दिवस रुजवत आहेत दिगंबर जोगदंड हे २०२४मध्ये पावसाळी अधिवेशनात पुणे ते मुंबई पदयात्रा काढून त्यांनी सरकारचे त्यांच्या आंदोलनाकडे लक्ष वेधले होते त्यावेळेस त्यांना मुंबई अधिवेशनामध्ये आश्वासन मिळालं होतं की अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार मिळण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवु . त्या आश्वासनावर त्यांनी त्या आंदोलन मागे घेतले त्यानंतर पुणे जिल्हा अधिकारी कार्यालयात सात दिवसाचे आमरण उपोषण देखील त्यांनी केले होते त्यानंतर २०२५ मध्ये ते सातत्याने अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार मिळावा यासाठी सरकारसोबत भांडत आहे परंतु अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार मिळावा यासाठी त्यांनी १६ जुलै २०२५ रोजी पुणे जिल्हाधिकारी कार्यालय या ठिकाणी पुणे जिल्ह्यामधील मातंग समाज घेऊन व बहुजन समाज घेऊन मोठ्या प्रमाणात त्यांनी आंदोलन केले . परंतु सरकार अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार लवकरात लवकर द्यावा अशी मागणी त्यांनी त्यांच्या निवेदनाद्वारे सरकारकडे केलेली आहे .राज्य व केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी व सरकारला जाग येण्यासाठी लवकरच जंतरमंतर वर उपोषण करणार असल्याचे जोगदंड यांनी सांगितले.



## शिरोली येथे कृषिकन्यांच्यावतीने वृक्षारोपन आणि पर्यावरण जनजागृती

राजगुरूनगर-किरण खुडे (आरंभ पर्व) : शिरोली (ता.खेड) येथे कृषिकन्यांच्या वतीने वृक्षारोपन आणि जनजागृती फेरीचे आयोजन करण्यात आले. जिल्हा परिषद शाळा शिरोली येथून जनजागृती फेरीचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी वृक्षारोपन व कृषी विषयक घोषणा दिल्या. यावेळी कृषिकन्यांनी ग्रामस्थांना पर्यावरण व शेतीचे महत्त्व पटवून दिले. जनजागृती फेरीच्या समारोपानंतर ग्रामपंचायतीच्या सहकार्याने सुमारे ५०० फळझाडांची रोपे विद्यार्थ्यांना मोफत देण्यात आली. उत्साही कृषिकन्या स्वप्नाली शिंदे, नम्रता नरळे, श्रद्धा गायकवाड, केनिशा वकारे, विरश्री सांगळे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. याप्रसंगी गावकऱ्यांमध्ये शेतीविषयक जनजागृती निर्माण करत शेतीविषयक माहिती कृषिकन्यांनी दिली. तसेच कृषिकन्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य भेटवस्तू स्वरुपात दिल्या. कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते. मान्यवरांनी मनोगतात कृषिकन्यांच्या उपक्रमाचे कौतुक केले.

## डिप्लोमा इन ऑप्थॅल्मिक असिस्टंट अभ्यासक्रम



पुणे (आरंभ पर्व) : पीबीएमएच्या एच व्ही देसाई आय हॉस्पिटल येथे दोन वर्षांचा डिप्लोमा इन ऑप्थॅल्मिक असिस्टंट अभ्यासक्रमासाठी प्रवेश सुरू झाला आहे . महाराष्ट्र बोर्ड/सेंट्रल बोर्ड व इतर मंडळ मान्यता प्राप्त असलेल्या शाळेतून बारावी उत्तीर्ण असलेल्या 30 विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश घेता येणार आहे. या अभ्यासक्रमाला नॅशनल कौन्सिल ऑफ व्होकेशनल अँड रिसर्च ट्रेनिंगची मान्यता आहे. अधिक माहितीसाठी 7887785226 या क्रमांकावर सकाळी 9 ते दुपारी 4 पर्यंत संपर्क साधता येणार आहे. प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या कार्यालयात अभ्यासक्रमाचा फॉर्म भरून त्यासोबत आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रति जोडणे गरजेचे आहे. गरजू विद्यार्थ्यांसाठी हडपसर येथे हॉस्पिटल जवळ राहण्याची सोय व जेवणाची सोय किंवा त्यासाठीचे अनुदान आणि ग्रामीण भागातून येणाऱ्या काही विद्यार्थ्यांना अनुदान दिले जाईल.

पत्ता : कॉलेज ऑफ ऑप्टोमेट्री,पीबीएमएचे एच व्ही देसाई आय हॉस्पिटल,93/2 तरवडे वस्ती,महंमदवाडी,हडपसर (पीओ),पुणे -411060
ई-मेल आयडी -aopcourses@hvdeh.org
संकेतस्थळ -www.hvdeh.org

# ग्रामीण भागातील मुलींना सक्षम बनविण्याचे कार्य कौतुकास्पद

## लीला पूनावाला यांचे प्रतिपादन; महिला सेवा मंडळ व विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वतीने मुलींच्या वसतिगृहाचे उद्घाटन




**पुणे (दै. आरंभ पर्व)**
मुलींना चांगल्या शिक्षणाची संधी मिळाली, तर त्या स्वतःबरोबर समाजाची प्रगती करतात. ग्रामीण भागातून पुण्यात शिकण्यासाठी येणाऱ्या मुलींना निवास-भोजनाची सोय करतानाच त्यांना व्यक्तिमत्व विकासाचे शिक्षण देऊन सक्षम बनवण्याचे कार्य कौतुकास्पद आहे. महिला सेवा मंडळ आणि विद्यार्थी साहाय्यक समितीच्या संयुक्त प्रयत्नांतून सुरु झालेले मुलींचे वसतिगृह अनेकींचे आयुष्य घडवेल," असे प्रतिपादन प्रसिद्ध उद्योजिका व समाजसेविका पद्मश्री लीला पूनावाला यांनी केले. महिला सेवा मंडळ आणि विद्यार्थी साहाय्यक समितीच्या संयुक्त विद्यमाने उभारलेल्या मुलींच्या वसतिगृहाचे उद्घाटन पूनावाला यांच्या हस्ते झाले. या वसतिगृहात नव्याने ८० मुलींची व्यवस्था होणार आहे. एरंडवणे येथील महिला सेवा मंडळाच्या प्रांगणात झालेल्या सोहळ्यात मराठवाडा मित्र मंडळ संस्थेचे कार्याध्यक्ष व समितीचे कायम विश्वस्त भाऊसाहेब जाधव, तुकाराम गायकवाड, महिला सेवा मंडळाच्या पुष्पा हेगडे, प्रतिभा घोरपडे, राखी शेट्टी, तनुजा पुसाळकर, समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, खजिनदार संजय अमृते, प्रकल्प समन्वयक प्रभाकर पाटील यांच्यासह दोन्ही संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

तुषार रंजनकर म्हणाले, "स्वच्छता, समता, स्वावलंबन या त्रिसूत्रीवर समितीचे कार्य सुरु आहे. समितीची वसतिगृहे परिवर्तनाची केंद्रे आहेत. ग्रामीण भागातील मुलांना घडवणारे हे मॉडेल पुण्यासह बाहेरही विस्तारण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. दोन चांगल्या संस्था एकत्रित येऊन चांगले काम होतेय, याचा आनंद आहे. संस्कार, मूल्यांचे शिक्षण येथे मिळते. या कार्यरत माजी विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग ही अभिमानाची गोष्ट आहे. हे एक देशकार्य असल्याच्या भावनेतून समिती काम करत आहे."

पुष्पा हेगडे म्हणाल्या, "गरजू विद्यार्थ्यांना पुण्यात शिकताना हातभार लागावा, सुरक्षित वातावरण मिळावे, यासाठी या दोन्ही संस्था काम करणार आहेत. महिला सेवा मंडळ गेली अनेक वर्षे मुलींच्या शिक्षणासाठी, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहे. समितीच्या साथीने या कार्याला आणखी चांगल्या पद्धतीने पुढे घेऊन जाता येईल. मुलींच्या शिक्षणासाठी समर्पित भावनेने कार्यरत असलेल्या लीला पूनावाला यांच्या हस्ते या वसतिगृहाचे उद्घाटन होणे, हा आनंदाचा क्षण आहे."

प्रभाकर पाटील यांनी हा वसतिगृह प्रकल्प साकारण्याचा प्रवास उलगडला. समितीच्या कार्यकर्त्या सुप्रिया केळवकर यांनी सूत्रसंचालन केले. ॲड. प्रतिभा घोरपडे यांनी आभार मानले.

## नव्या उपक्रमांसह पीआयबीएमचा विस्तार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
पुणे इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट (पीआयबीएम ) ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स तर्फे एव्हिएशन मॅनेजमेंट आणि एव्हिएशन इंजिनीअरिंग , तसेच सेमीकंडक्टर डिझाइन या अत्याधुनिक अभ्यासक्रमांचा समावेश असलेले अभ्यासक्रम लवकरात लवकर सुरू करणार असल्याची माहिती चेअरमन, रमण प्रीत यांनी दिली. आपल्या संस्थेच्या भविष्यातील महत्त्वाकांक्षी योजना जाहीर करताना त्यांनी उद्योगाशी सुसंगत व्यावसायिक अभ्यासक्रमांची आवश्यकता यावेळी अधोरेखित केली.यावेळी बोलताना प्रीत यांनी व्यावसायिक व्यवस्थापन पदवी अभ्यासक्रम हे रोजगारभिमुख असावेत, बाजारातील नव्याने विकसित होत असलेल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी आणि डिजिटल साक्षरतेला प्रोत्साहन देणारे शिक्षण असावे यासाठी पीआयबीएम करत असलेल्या प्रयत्नांचा आढावा घेतला. संस्थेची प्रगती दर्शवताना, प्रीत यांनी चंदीगड आणि दुबई येथे



कॅम्पससह पाच नवीन कॅम्पस उघडण्याची त्यांची योजना प्रत्यक्षात आली असल्याचे सांगितले. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पीआयबीएमच्या शैक्षणिक मॉडेलला मान्यता मिळालेली असून उदयोन्मुख उद्योगांना पूरक असे नवीन अभ्यासक्रम सुरू केले असल्याची माहिती त्यांनी दिली.

## फुफ्फुस विकारग्रस्तांना प्राणवायू उपकरण संचांची भेट



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
करोनाची प्राणघातक साथ मानवजातीला खूप काही शिकवून गेलीय. शरीराचे तापमान, रक्तदाब, रक्तशर्करेचे प्रमाण, हृदयाचे ठोके याप्रमाणेच आजकाल श्वासोच्छवासातील प्राणवायूच्या (ऑक्सिजन) पातळीवरही काटेकोर लक्ष ठेवणे गरजेचे बनले आहे. फुफ्फुसांच्या आजारांनी दुर्बळ रुग्णांसाठी शुद्ध प्राणवायूचा तत्काळ पुरवठा अत्यंत मोलाचा ठरत आहे आणि एका श्वासाची किंमत जगाला आता उमगू लागली आहे. 'प्रतिभा प्रभाकर पल्मोनरी रिहॅबिलीटेशन सेंटर'च्या वतीने श्वसन संस्थेचे आरोग्य आणि प्राणवायूचे महत्त्व अधोरेखित करणारा एक कार्यक्रम नुकताच गोरेगावमध्ये आयोजित करण्यात आला. समाजोपयोगी उपक्रमांना मदतीचा हात देणारे सुप्रसिद्ध उद्योजक मसालाकिंग डॉ.धनंजय दातार या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. फुफ्फुसाच्या विकाराने ग्रस्त, परंतु आर्थिक असहाय्यतेमुळे प्राणवायू पुरवठा उपकरणे खरेदी न करु शकणाऱ्या ६ गरजू रुग्णांना दातार यांनी स्वखर्चाने असे उपकरण संच भेट दिले. प्रत्येक संचात घरात हवा तेव्हा प्राणवायू पुरवठा करणारे ५ ते १० लिटर्स क्षमतेचे ऑक्सिजन कॉन्संट्रेटर या उपकरणांचा समावेश होता. याआधी गेल्या वर्षीही ८ रुग्णांना श्री. दातार यांनी अशीच मदत केली आहे. याप्रसंगी बोलताना डॉ.धनंजय दातार म्हणाले, माझ्या आईच्या अखेरच्या दिवसांत ती फुफ्फुसाच्या आजाराने गलितगात्र झाली होती. श्वासोच्छवासासाठीची तिची धडपड मला बघवत नव्हती. आजही अशा आजारांनी ग्रस्त गरीब रुग्णांचे हाल मला अस्वस्थ करतात.

करोना साथीच्या काळात तत्काळ प्राणवायू न मिळाल्याने अथवा वाहनाच्या अनुपलब्धतेमुळे रुग्णालयात वेळेवर पोचू न शकल्याने अनेक रुग्ण दगावले. त्यावर उपाय म्हणून मी व माझ्या समूहाने ऑक्सिजन सिलेंडरने सज्ज 'रिक्षा ॲम्ब्युलन्स' या अभिनव उपक्रमाला आर्थिक पाठबळ पुरवले.

गेल्या वर्षी आणि यंदाही पैशाअभावी प्राणवायू उपकरणे खरेदी करु न शकणाऱ्या रुग्णांना आम्ही प्राणवायू संच भेट दिले आहेत आणि यापुढेही गरीब गरजूंना अशीच मदत करत राहणार आहोत.

## शालेय शिक्षणात आयुर्वेदाचा अंतर्भाव करण्याची गरज

- वैद्य तनुजा नेसरी यांचे मत
- प्राचीन संहिता गुरुकुलातर्फे 'दिग्गजांच्या मुलाखती' संवाद कार्यक्रम



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
"आयुर्वेदासारख्या प्राचीन व पारंपरिक ज्ञानाला संशोधन व आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळावी. आयुष्यभर विद्यार्थ्यांच्या भूमिकेतून ज्ञान, कौशल्ये आत्मसात करावीत. सतत शिकण्याची वृत्ती, सकारात्मक मानसिकता, कठोर परिश्रम, नेतृत्वक्षमता आणि तंत्रज्ञानाचा अंतर्भाव यामुळे आपले जीवन अधिक समृद्ध होते," असे प्रतिपादन पुण्याचे पोलीस सहआयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी केले.

प्राचीन संहिता गुरुकुल आयोजित 'दिग्गजांच्या मुलाखती' उपक्रमांतर्गत ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरभ राव, आयुर्वेद अध्यापन व संशोधन संस्थेच्या संचालक वैद्य तनुजा नेसरी व पुण्याचे पोलीस सहआयुक्त रंजनकुमार शर्मा यांच्याशी संवाद कार्यक्रम रंगला. टिळक रस्त्यावरील गणेश सभागृहात झालेल्या कार्यक्रमावेळी वैद्य हरिश पाटणकर, वैद्य स्नेहल पाटणकर, बाळराजे खर्डेकर, सुरेश मोहिते, नीता मोहिते, अजय फराटे, धीरेंद्रराजे खर्डेकर, सिध्दसेनराजे खर्डेकर, वैद्य विनेश नगरे, वैद्य संतोष सूर्यवंशी, वैद्य सुहास हेर्लेकर, वैद्य योगिनी पाटील आदी उपस्थित होते.

यावेळी प्राचीन संहिता गुरुकुल, केशायुर्वेद आणि कायायुर्वेद परिवाराच्या नवीन संस्थेच्या वास्तूचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले. वैद्य हरीश पाटणकर लिखित 'द ब्रह्मा कोड' या पुस्तकाचे, वैद्य पाटणकर संशोधित व निर्मित ट्रायरेज हेअर ऑइलचे, इंडियन नॉलेज सिस्टीम ऑलिम्पियाडचे अनावरण झाले. 'गुरुकुल'च्या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार व वैद्य तनुजा नेसरी यांना 'आचार्य पुरस्कार' प्रदान करण्यात आला. वैद्य विवेक आंबरे यांनी सूत्रसंचालन केले. वैद्य स्नेहल पाटणकर यांनी आभार मानले.

रंजनकुमार शर्मा म्हणाले, "प्राचीन ज्ञान व परंपरा जगभर पोहोचण्यासाठी होत असलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत.

प्रत्येकाने चांगले काम करण्याचा, नकारात्मक परिस्थितीवर मात करून सकारात्मक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एकत्रित कुटुंबपद्धती, परस्परांतील संवाद ही भारतीय संस्कृतीची ओळख आहे. गॅजेट्समुळे अलीकडे कुटुंब विभक्त होताहेत.

## 'त्या' मंदिरात पुन्हा प्रवेश करण्याची आमची इच्छाच मेली

- पुण्यातील माजी आमदारांनी व्यक्त केली उद्विग्न भावना
- महाराष्ट्र विधीमंडळात गुंड व गुन्हेगारांच्या हैदोसा विरोधात पुणे स्थित माजी आमदारांची संयुक्त पत्रकार परिषद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
आम्ही आहोत पुणे शहरात राहणारे माजी आमदार, आज आम्ही राजकारणात सक्रीय आहोत असा आमचा दावा नाही, पण कधीतरी आम्ही आमदार होतो आणि महाराष्ट्राच्या विधानसभेत सदस्य म्हणून बसत होतो. आम्ही कोणत्या राजकीय पक्षातर्फे जनतेचे प्रतिनिधी म्हणून विधानसभेत बसत होतो ही बाब गौण आहे. आमच्या काळात विधानसभेचे सभागृह राज्यातील सर्वोच्च पवित्र असे मुक्त संवादाचे, प्रामाणिक मतभेद व्यक्त करण्याचे तीर्थ स्थळ होते, हे सर्वोच्च सभागृह पूर्णपणे सुरक्षित होते, आता आमची इच्छाच मेली ! अशी उद्विग्न भावना पुण्यातील माजी आमदारांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र विधीमंडळात गुंड व गुन्हेगारांच्या हैदोसा विरोधात पुणे स्थित ज्येष्ठ माजी आमदारांची युवक क्रांती दलाच्या वतीने संयुक्त पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका मांडली. या प्रसंगी डॉ. कुमार सप्तर्षी, ॲड. वंदना चव्हाण, ॲड. जयदेवराव गायकवाड, बाळासाहेब शिवरकर, ॲड. एल. टी. सावंत,, संयोजक राहुल डंबाळे आदि मान्यवर उपस्थित होते.

# स्त्रियांनी सक्षमपणे घर सांभाळल्याने पुरुषांना वैभव : डॉ. अरुणा ढेरे

## एमआयटी एडीटी विद्यापीठात उर्मिलाताई कराड सभागृहाचे अनावरण



**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**
'सावळागा गं रामचंद्र, त्याचे अनुज हे तीन, माझ्या भाग्याच्या ओविचे हे चार अखंड चरण...' या ओविंप्रमाणे भारतातील सोशिक, सात्विक परंपरेतील स्त्रिया कशाचाही विचार न करता आपले घर, परिवार उचलून धरतात. स्व. उर्मिलाताई कराड त्यातीलच एक होत्या. पूर्वीच्या काळात आमच्या बायका निरक्षर असतील पण परंतू त्या बुद्धिमान, प्रतिभावान होत्या. त्यांनी परिवारासाठी असंख्य गोष्टींचा त्याग करत आपला संसार मोठा केला. त्यामुळे, पुरुष स्वप्नपूर्तीसाठी घराबाहेर पडत असताना स्त्रियांनी सक्षमपणे घर सांभाळल्यामुळे पुरुषांना वैभव प्रात्प झाले, असे मत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या माजी अध्यक्षा तथा ज्येष्ठ साहित्यिक डॉ.अरुणा ढेरे यांनी मांडले.

त्या एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टॅक्नॉलॉजी विद्यापीठ, विश्वराजबाग, पुणे परिसरात नव्याने उभारण्यात आलेल्या उर्मिलाताई कराड सभागृहाच्या अनावरण कार्यक्रमाप्रसंगी बोलत होत्या.

या प्रसंगी माईर्स एमआयटी शिक्षण समुहाचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, भारतीय सिने पत्रकार पद्मश्री भावना सोमाया, सुप्रसिद्ध लेखक व कवी इंद्रजीत भालेराव, तुळशीराम कराड, काशीराम कराड, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ. मंगेश कराड, सौ.ज्योती अ.ढाकणे, डॉ.सुचित्रा उ.नागरे, सौ.पुनम आ. नागरगोजे, विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.राजेश एस., आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

ढेरे पुढे म्हणाल्या, स्व. उर्मिलाताईंची अनेकदा कवयित्री शांताबाई शेळके यांच्या घरी, आळंदीत भेट झाली. त्यांनी लिहिलेल्या काव्यसंग्रहांमध्ये मातृत्व, वात्सल्य, वारकरी परंपरेचे संस्कार प्रतिबिंबित होतात. या भव्य सभागृहाला त्यांचे नाव दिल्याने त्या आपल्यात सदैव जिवंत राहणार आहेत.

डॉ.मंगेश कराड म्हणाले, स्व. उर्मिला काकी या एक त्यागमुर्ती होत्या. त्यांनी परिवारासाठी केलेल्या त्यागामुळेच आम्ही सर्व भावंड खऱ्याअर्थाने घडलो. त्यांच्या त्याग आणि आशिर्वादामुळेच आज कराड कुटुंबाची भरभराट झाली आहे. त्यांनी घर सांभाळत असताना तब्बल ९ पुस्तकांचे लेखन केले. त्यांचे कार्य या सभागृहमुळे भावी पिढीला कळत राहील.

पद्मश्री भावना सोमाया यांनीही यावेळी, स्व.उर्मिलाताईंच्या कार्याचा उल्लेख करताना, सभागृहाच्या रचनेचे कौतुक केले. ज्येष्ठ कवी इंद्रजीत भालेराव यांनी यावेळी स्त्रियांचा कुटुंबासाठीच्या त्यागाचे सुंदररित्या काव्यरूपी विवेचन केले. त्यांनी भाषणाच्या शेवटी स्व. उर्मिलाताईंवर लिहिलेल्या कवितेने सभागृहाला भावूक केले.

याप्रसंगी भावना सोमय्या यांच्या 'फेरवेल कराची' या फाळणीवर आधारीत पुस्तकाचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विश्वशांती प्रार्थनेने सुरु झालेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यवाह डॉ. वि.दा.पिंगळे यांनी तर आभार सुचित्रा कराड-नागरे यांनी मानले. डॉ.अशोक घुगे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

दिवंगत अभिनेते राज कपूर यांच्या अत्यंत जवळ असणारी ही विश्वराजबाग अत्यंत खास आहे. कला, डिजाईन आणि तंत्रज्ञान अशी ओळख असणाऱ्या या विद्यापीठाचे प्रतिबिंब या सभागृहात दिसते. हे सभागृह स्थापत्यकलेचा एक उत्कृष्ठ नमुना असून त्याने सांस्कृतिक व शिक्षणनगरी पुण्याच्या वैभवात भर घातली आहे, असे म्हणत प्रा.डॉ.विश्वनाथ कराड यांनी एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या व्यवस्थापनाचे कौतुक केले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.